४१९८२१५२

[illegible]/पुधि/ २००२/
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : -8 APR 2002

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद,
२. प्रशासन अधिकारी,
मनपा/नप्रा., प्राथमिक शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड, पुणे-१८.

रुपीनगर शिक्षण प्रसारक मंडळ
आवक क्र. ३/२००१-२
दि. ९/[illegible]/२००२

विषय : सन २०००- २००१ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत, माध्यम - मराठी

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील शासन पत्र क्रमांक पीएलसी-१००० /(५५८/ २०००) (—)/प्राशि-३, दिनांक - २८. ३. २००२ .

[illegible] विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या माध्यमातून सन २०००- २००१ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

अ.क्र.	संस्थेचे नाव	शाळेचे ठिकाण	माध्यम
१.	श्री. भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी, तळवडे, पुणे.	रुपीनगर, तळवडे जि. पुणे.	मराठी
२.	रुपीनगर शिक्षण प्रसारक मंडळ, तळवडे ता. हवेली जि. पुणे.	मौजे तळवडे, ता. हवेली जि. पुणे.	मराठी

त्याबाबत [illegible] खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे या बाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायांसह [illegible] या कार्यालयास सादर करावा. आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधित [illegible] यांना परवानगी देणे/न देणे बाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

१. संस्था [illegible], संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, [illegible] मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. [illegible] गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. [illegible] संस्थेने [illegible] अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. [illegible] गैरव्यवहार [illegible] या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा [illegible] प्रकरण प्रलंबित नाही.
५. [illegible] समाधानकारक आहे.
६. [illegible] सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजुरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवल्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी आवश्यक बाबींची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या निश्चित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळा सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच मान्यता प्रदान करावी.
११. सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधित संस्था उघडणार नाही, असे संबधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकडया संबंधित शाळा काढणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे
१३. संस्थेस ज्या वर्षी शाळेस परवानगी द्यावयाची आहे त्यावर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षीच्या शाळा नुतनीकरणासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षातच वर्ग करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.
१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित कागदावर संस्था कायमस्वरुपी विना-अनुदान तत्वावर मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही हे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करुन ठेवाव्यात.
१५. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी. (उदा. नाव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता)

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१ करिता

प्रत माहितीस्तव सविनय सादर
मा. [illegible], [illegible] शिक्षण विभाग, मंत्रालय [illegible] भवन, मुंबई-३२
२. [illegible]
प्रति,
२. [illegible]
Josh [illegible]

१] श्री. भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी, तळवडे, पुणे.
२] रुपीनगर शिक्षण प्रसारक मंडळ, तळवडे, ता. हवेली जि. पुणे.

Scanned with CamScanner